**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

माहितीचा अधिकार

**अपील क्रमांक : १०३६/२०२१**

**अपिलार्थी, श्री. मंदिप मारोती गोरडवार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
कृषि उत्पन्न बाजार समिती गडचिरोली, ता.जि. गडचिरोली

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,**
कृषि उत्पन्न बाजार समिती गडचिरोली, ता.जि. गडचिरोली

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १३.०२.२०२३**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : अनुपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १८.१२.२०२० | १९.१२.२०२० | १८.०१.२०२१ | निरंक |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक १८.१२.२०२०** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " १) सन २०१८ ते २०२१ पर्यंत शेतक-याकडून धान्य खरेदी-विक्री करीता सातबारा घेवून नोंद केलेल्या रजिस्टरच्या सत्यप्रती नस्तीसहीत २) शेतक-याकडून धान्य खरेदी करुन शेतक-यांना दिलेल्या बिल बुकाच्या पावत्यांच्या सत्यप्रती ३) शेतक-यांनी विक्री केलेल्यांची नावाची यादी ४) प्रत्येक वर्षी खरेदी केलेल्या एकूण धान्याची माहिती " इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १९.१२.२०२० रोजीच्या पत्रान्वये, मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ, औरंगाबाद यांनी अपील क्रमांक ७०६९/२०१८ दिनांक २५.०७.२०१९ अन्वये श्री. बालाजी बळीराम बंडे रा.मु.पो.मुखेड जि. नांदेड विरुध्द १) जन माहिती अधिकारी, कृषि उत्पन्न बाजार समिती, मुखेड जि. नांदेड २) प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, मुखेड जि. नांदेड या प्रकरणात कृषि उत्पन्न बाजार समितीस माहिती अधिकार अधिनियम लागू होतो किंवा कसे या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने पिटीशन फार स्पेशल लिव्ह अपिल ©.......CC ३५९३/२०१६ कृषि उत्पन्न बाजार समिती विरुध्द मुख्य माहिती आयुक्त आणि इतर या प्रकरणात दिनांक २९.०२.२०१६ रोजी स्थगिती आदेश दिलेला आहे. तरी आपणाकडे हया संदर्भात या व्यतिरिक्त वेगळा न्याय निवाडा असल्यास आम्हाला पुरवावा, असल्यास त्यासंबंधाने विचार करणे सोईचे होईल, असे अपिलार्थीस कळविण्यात आलेले आहे.

त्यानंतर अपिलार्थी यांनी व्यथित होऊन **दिनांक १८.०१.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "माहिती न दिल्यामुळे " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५.०२.२०२१ रोजी सुनावणी आयोजित केल्याचे आढळून येते. परंतू प्रत्यक्षात सुनावणी घेवून आदेश पारीत केल्याचे आढळून येत नाही.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक १९.०४.२०२१ रोजी** " माहिती मिळाली नाही " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक १३.०२.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांवरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये कृषि उत्पन्न बाजार समितीस माहिती मागितलेली आहे. परंतु कृषी उत्पन्न बाजार समितीस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होतो किंवा कसे, यासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयात पिटीशन फार स्पेशल लिव्ह अपील (C) ---CC3593/2016 कृषी उत्पन्न बाजार समिती विरुध्द मुख्य माहिती आयुक्त आणि इतर या प्रकरणात दि. २९.०२.२०१६ रोजी स्थगिती आदेश दिलेले आहेत. सदरचे प्रकरण मा. सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे. त्यामुळे जोपर्यंत मा. सर्वोच्च न्यायालय यांचेकडून या विषयावर अंतिम आदेश पारीत केला जात नाही, तोपर्यंत या प्रकरणात आयोगाकडून आदेश पारीत करणे यथोचित होणार नाही. **याबाबतीत मा. राज्य माहिती आयोग, औरंगाबाद खंडपीठाने श्री. बालाजी बंडे विरुध्द कृषी उत्पन्न बाजार समिती मुखेड,जि.नांदेड, अपील क्र.७०६९/२०१८ यात दिनांक २५.०७.२०१९ रोजी याच प्रकारचा निर्णय दिलेला असल्याचा लेखी खुलासा प्राधिकरणाच्या वतीने करण्यात आलेला आहे.** ही बाब लक्षात घेता, सदर प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय प्राप्त होईपर्यंत कोणतेही पुढील आदेश पारीत करणे संयुक्तिक होणार नाही. दरम्यान अपिलार्थी यांनी सादर केलेल्या माहिती अर्जातील माहितीत प्रथमदर्शनी व्यापक जनहित लक्षात घेता, जर कृषि उत्पन्न बाजार समिती गडचिरोली यांचेकडे नस्ती स्वरुपात माहिती उपलब्ध असल्यास ती स्वंयप्रेरणेने जारी करणे अधिक संयुक्तिक ठरेल, या सुचनेसह प्रस्तूत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**प्रस्तूत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १३.०२.२०२३**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

जावक क्रमांक 4418 दिनांक 20 JUL 2023